'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 2
ISSN : 2348-7143 (Online)
April-June-2014

# ''भारतातील अन्न सुरक्षितता आणि दारिद्रय''

प्रा. सोनवणे बी. एम.
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
एम. जी. व्ही. कला महाविद्यालय, सौंदाणे,
ता. मालेगांव, जि. नाशिक,
महाराष्ट्र, भारत.

**प्रस्तावना :**

ब्रिटिश भारतात येण्याआधी भारतातील ग्रामीण भाग अत्यंत सधन होता असे भारताच्या सातंत्र्यापूर्वीच्या इतिहासावरून स्पष्ट होते. ग्रामीण भागात बाराबलुतेदार व्यवस्था असल्यामुळे खेडयातील गरजा खेडयातच पूर्ण केल्या जात. खेडयातील प्रमुख व्यवसाय शेती व शेतीव्यतीरिक्त अनेक हस्तउद्योग, कुटीरोद्योग हे पारंपारिक पध्दतीने करण्यात येत असत. यामुळे स्वातन्त्र्यापूर्वी भारतातील ग्रामीण भागात फारशा समस्या जानवत नव्हत्या ब्रिटिशांनी 1600 मध्ये भारतात (तेव्हाचा हिन्दुस्थान) व्यापार करण्याच्या उद्येशाने इस्ट इंडिया कंपणीची स्थापना केली. व्यापाराबरोबरच साम्राज्य विस्ताराच्या धोरणामुळे ब्रिटिशांनी भारतात प्रशासकीय हस्तक्षेप करण्यास प्रारंभ केला. पुढे 1857 पासुन ब्रिटिशांनी संपुर्ण भारताच्या प्रशासनाची सुत्रे स्वतःच्या हातात घेतली. जवळपास याच कालावधित इंग्लडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्यामुळे औद्योगिक क्षेत्रात निर्माण करण्यात आलेल्या अनेक वस्तू भारतात विक्रिसाठी आणल्या याचा परिणाम भारतातील ग्रामीण भागातील बाराबलुतेदारांवर झाला. बहुसंख्य ग्रामीण हस्तउद्योग–कुटीरोद्योगात काम करणा–या कामगारांवर बेकारीची कु–हाड कोसळली. असंख्य कारागिरांवर बेकारीची व उपासमारीची वेळ आली. बेकार झालेल्या कारागिरांना खेडयात जमीनदारांकडे 'कुळ' म्हणुन काम करावे लागले. या कुळांचे जमीनदारांकडून मोठया प्रमाणात शोषण झाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ होढवली गेली. परंतु ब्रिटिशांनी जाणुनबुजून दुर्लक्ष केल्यामुळे भारतात भुकबळी–कुपोषण व उपासमारीसारख्या भयावह समस्या निर्माण झाल्या.

भारताला 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र या भयावह समस्येच्या सोडवणुकीसाठी कृषी विकासावर अधिक भर देण्यात आला. 1965 मध्ये कृषी विकासाचा नीवन दृष्टीकोन स्विकारण्यात आला. 1971–72 पासून भारतात अन्नधान्याच्या उत्पादनात भरीव वाढ झाली. परंतु वाढत्या किंमती व समाजातील दारिद्रयात जीवन जगणा–या व्यक्तींची खरेदीशक्ती कमालीची कमी असल्यामुळे देशात अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन होऊन सुध्दा कुपोषण–उपासमारी सारख्या समस्या दारिद्रयात जीवन जगणा–या कुटुंबात बघायला मिळतात.

**शोध निबंधाची उद्यिष्टये :**

1. अन्न सुरक्षितता व दारिद्रयाची संकल्पणा अभ्यासणे.
2. अन्न सुरक्षिततेसाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिते अभ्यासणे.

3. अन्न सुरक्षितता उपाययोजनांचा दारिद्रयात जीवन जगणा–या व्यक्तींना होणा–या लाभाचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाचे गृहीतक :**

अन्न सुरक्षिततेत वाढ करण्यासाठी योजिलेल्या शासकीय उपक्रमांचा दारिद्रयात जीवन जगणा–या व्यक्तींना लाभ झालेला आहे.

**संशोधन पध्दती :**

शोध निबंधासाठी माहिती संकलित करण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आलेला आहे. कारण शासनाने ज्या विविध अन्न सुरक्षितेसंबंधी उपाययोजना केलेल्या आहेत त्या पूर्व प्रकाशित आहेत. तसेच देशातील दारिद्रयाचे सर्वेक्षण झालेले असल्यामुळे देशातील दारिद्रयाची योग्य माहिती देखील प्रकाशित झालेली आहे. या उपलब्ध माहितीच्या आधाराने सदर शोध निबंधाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

**संकल्पना :**

**अ) अन्न सुरक्षितता :**

1. ''देशातील सर्व व्यक्तींना पाहीजे त्यावेळी खाण्यासाठी मुलभत भौतिक व आर्थिक हया दोन्ही रूपात उपलब्ध करून देण्याची हमी म्हणजे अन्न सुरक्षा होय''. – अन्न व कृषी संघटना – 1983.
2. ''देशातील सर्व व्यक्तींना सक्रीय आणि सुदृढ जीवन जगण्यासाठी सर्व वेळेला पर्याप्त अन्नाची उपलब्धता असणे म्हणजे अन्न सुरक्षा होय''.– जागतिक विकास अहवाल – 1985.

**आ) दारिद्रय :**

1. ''दारिद्रय ही अशी अवस्था आहे की, ज्या अवस्थेत समाजातील काही गटांना अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान आवश्यक गरजा देखील पूर्ण करता येत नाहीत.''

वरील संकल्पनांवरून थोडक्यात असे म्हणता येईल की, व्यक्तीला एका दिवसात दोन वेळेस किमान उष्मांक असलेला आहार मिळणे याला अन्न सुरक्षितता असे म्हणता येईल व ज्यांना दोन वेळेचे किमान उष्मांक असलेला आहार विकत घेण्याइतके उत्पनन मिळत नाही अशांना दारिद्रयात जीवन जगणा–या व्यक्ती असे म्हणणे योग्य ठरेल.

**भारतातील अन्न सुरक्षितता – विविध शासकीय योजना :**

भारतातील सामान्य व्यक्तींना आणि दारिद्रयात जीवन जगणा–या व्यक्तींना 'अन्न सुरक्षितता' निर्माण करण्यासाठी शासन पातळीवरून सवलीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे. स्वातंत्र्यानंतर देशात व्यापक स्वरूपात अन्न सुरक्षिततेसंबंधी विविध उपाययोजना शासनपातळीवर करण्यात आलेल्या आहेत. या उपाययोजनांचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे.

**1. एकात्मिक बालविकास कार्यक्रम (1975)**

देशातील शहरी आणि ग्रामीण भागातील सहा वर्षाखालील बालकांना प्रतिदिन 300 उष्मांक व 12.5 ग्रॅम प्रोटीनचा पुरवठा होईल एवढे अन्न उपलब्ध करून देण्याच्या उद्येशाने 1975 मध्ये एकात्मिक बालविकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली हा कार्यक्रम केंद्रशासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयामार्फत कार्यान्वीत करण्यात येतो.

**2. मध्यान्ह भोजन योजना (1995)**

देशातील प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिक्षण घेणा–या सर्व विद्यार्थ्यांना शाळेत दुपारचे एकवेळचे जेवन देण्याच्या उद्येशाने केंद्रशासनाने 1995 पासून मध्यान्ह भोजन योजना सुरू केली आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्यास 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रोटीन प्रतिदिन मिळतील अशी तरतुद करण्यात आलेली आहे. या योजनेचा लाभ देशातील सर्व शासकीय अनुदानित व विनाअनुदानित शाळेत शिक्षण घेणा–या विद्यार्थ्यांना होत आहे.

**3. अंत्योदय अन्न योजना (2000)**

या योजनेअंतर्गत देशातील दारिद्रय रेषेखालील पाच व्यक्तींचे कुटंब गृहित धरून एका कुटुंबाला महिन्याला 35 किलो धान्य (गहु व तांदुळ) अत्यल्प किंमतीत उपलब्ध करून देण्यात येते. ही योजना केंद्र शासनाने डिसेंबर 2000 मध्ये संपुर्ण भारतात लागु केलेली आहे. या योजनेत गहु 2 रू. किलो व तांदुळ 3 रू. किलो या दराने उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**4. राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अभियान**

भारतातील शहरी व ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाला महिन्याला 20 किलो धान्य 3 रू. किलो या दराने उपलब्ध करून देण्याच्या उद्येशाने केंद्रशासनाने 2010 मध्ये संसदेत राष्ट्रीय खादय सुरक्षा अभियान कायदा पारित केला.

**5. अन्न सुरक्षा कायदा**

भारत सरकारने 2013 मध्ये देशातील दारिद्रय रेषेखालील आणि इतर कमी उत्पन्न असलेल्या देशातील 67 टक्के जनतेला अत्यल्प किंमतीत धान्य उपलब्ध करून देण्याचा कायदा पारित केला आहे. या कायदयान्वये पाच व्यक्तींचे कुटुंब गृहित धरून त्यांना महिन्याला 35 किलो धान्य अत्यल्प किंमतीत देण्याचे ठरविले आहे. या कायदयामुळे ज्यांची खरेदी शक्ती कमी आहे. अशा कुटुंबातील व्यक्तींना अन्नधान्य खरेदी करणे शक्य होणार आहे.

**अन्न सुरक्षा व दारिद्रय :**

भारतात सन 2011–12 मध्ये देशातील 21.9 टक्के जनता दारिद्रय रेषेखालील जीवन जगत आहे. देशातील 122 कोटी लोकसंख्येपैकी एवढया मोठया प्रमाणात दारिद्रय असल्यामुळे अन्न सुरक्षा योजना एक

जीवनदायी योजना ठरली आहे. दारिद्रय रेषेखालील व्यक्तींकडे संसाधनांचा अभाव असल्यामुळे व नियमित रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे या व्यक्तींना कुटंबासाठी पुरेसे अन्नधान्य खरेदी करणे जिकिरीचे असते. यामुळेच पुरेसे अन्नधान्य देशातील शहरी व ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील व इतर गरीब व्यक्तींना मिळावे या उद्येशाने शासनाने अन्न सुरक्षितता या संकल्पने व्दारा देशातील गरिबांना व दारिद्रय रेषेखालील कुटंबांना अन्न–धान्याची तरतुद कायादयाव्दारे केलेली आहे.

भारतामध्ये आजदेखील विविध समस्या आहेत यात प्रामुख्याने वाढती बेकारी, शेतीची अल्पउत्पादकता, प्रचंड भाववाढ, रूपयाच्या बाहयमुल्यात घसरण व भ्रष्टाचार यांचा समावेश होतो. या समस्यामुळे देशातील दारिद्रयात जीवन जगणा–या व्यक्तींचे जीवन अधिकच गुंतागुंती होत आहे. या गरीब व्यक्तींना सामाजिक दृष्टीकोनातुन सुरक्षितता प्राप्त करून देण्याच्या उद्येशाने ''अन्न सुरक्षितता'' कायदा अत्यंत उपयोगी व परिणामकार आहे असे म्हणावे लागेल. मात्र या कायदयाची अंमलबजावणी कायदयातील तरतुदीशी सुसंगत असावी व अंमलबजावणीत कोणत्याही त्रृटी राहु नयेत असे झाल्यास 'अन्न सुरक्षा' कायदा जगातील एक आदश कायदा ठरेल.

**सारांश :**

भारतातील दारिद्रय रेषेखालील वंचित–पिडीत व गरिब लोकांना चांगल्या प्रतिचे सकस अन्न मिळावे या उद्येशाने शासन पातळीवरून 'अन्न सुरक्षा' अंतर्गत विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. 'अन्न सुरक्षा' कार्यक्रमाची प्रभावी व कार्यक्षम पध्दतीने अंमलबजावणी केल्यास देशातील दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना कायमस्वरूपी दिवसात दोन वेळेचे अन्न उपलब्ध होईल. यामुळे देशातील दारिद्रय रेषेखालील व गरिब लोकांना अन्नाच्या बाबतीत सुरक्षितता वाटु लागेल.

**संदर्भ :**

1. ''भारतीय अर्थव्यवस्था'' – दत्ता सुंदरम्
2. ''भारतीय अर्थव्यवस्था समस्या व भवितव्य'' – डॉ.आर.के.दातार, .सुहास आव्हाड
3. ''आर्थिक सर्वेक्षण'' – 2011–12, 2012–13.
4. ''योजना आयोग'' (दारिद्रयाचा अहवाल) – 2013
5. दैनिक सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता – 2013.